# कुंभमेळ्यांतील काही साधूंची भोंदूगिरी
## (संतांकडून अपेक्षित असलेले कार्यही अंतर्भूत)

## अनुक्रमणिका

### प्रकरण १
### कुंभमेळ्यांतील काही लांच्छनास्पद प्रकार !

### अनुक्रमणिका


**१. कुंभमेळ्यातील काही साधू-संतांचे हिंदु धर्माला काळीमा फासणारे आणि 'संत' या पदवीचा अवमान करणारे वर्तन !** **१३**

१ अ. कुंभपर्वाला येणाऱ्या साधूंपैकी केवळ २ टक्के साधू खरे साधू असणे ! १३

१ आ. सर्वसाधारण व्यक्तीसारखे दोष असलेले साधू ! १३

१ इ. सर्वत्र अस्वच्छता करणे १४

१ ई. वाटेल तशी लावलेली भित्तीपत्रके १६

१ उ. ध्वनीप्रदूषण १६

१ ऊ. प्रसिद्धीलोलुपता १७

१ ए. पैशांचा अपव्यय २३

१ ऐ. लोभी साधू २५

१ ओ. व्यसनाधीनता २८

१ औ. अहंकार ३०

१ अं. वादविवाद करणारे भांडखोर साधू ! ३५

१ क. साधूंच्या गैरवागणुकीची इतर सूत्रे ३६

१ ख. साधू आणि संत यांतील दुरावा ४०

१ ग. राष्ट्र आणि धर्म यांप्रती उदासीन असलेले साधू-संत ४२

१ घ. सनातनच्या साधकांना काही साधूंचे आलेले वाईट अनुभव ४५

२. काही आखाड्यांची दुःस्थिती ४९
३. काही नागा साधूंची दुःस्थिती ५३
४. पेशवाईतील गैरप्रकार ५५
५. साधू-संतांमधील गटबाजी अन् त्यांची राजकीय पक्षांशी जवळीक ५९
६. कुंभमेळा आणि धर्माचार्य यांच्या सद्यस्थितीविषयी संतांनी केलेले भाष्य ६०
७. प्रयाग कुंभमेळ्यातील नियोजनाचा अभाव असणारे संत-संमेलन ६१
८. आता अवताराला अवतरित होऊन धर्मस्थापनेचे कार्य करावे लागणार असणे ६३
९. कुंभमेळ्याचा उद्देश सफल होण्यासाठी साधू-संतांचे दायित्व ६५
१०. कुंभपर्वाचे औचित्य साधून धर्माचार्य आणि संतमहंत यांनी धर्मशिक्षण, धर्मप्रबोधन, धर्मरक्षण अन् हिंदुसंघटन ही चतुःसूत्री घेऊन संघटितपणे कार्य करावे, ही प्रार्थना ! ६७

## प्रकरण २

## कुंभमेळ्यांत जाणवलेली काही चांगली सूत्रे

### अनुक्रमणिका

**१. कृतीप्रवण असणारे आणि आदर्श कार्य करणारे साधू-संत**
१ अ. कुंभमेळ्यात सापडलेली हिरेजडित सोन्याची अंगठी तिच्या धन्याला लवकरात लवकर परत देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणारा वयस्कर बैरागी साधू ! ६९
१ आ. पूर्वाम्नाय पुरी गोवर्धनपीठाचे पूज्य स्वामी श्री निश्चलानन्द सरस्वतीजी महाराज ७०
१ इ. छत्तीसगढ राज्यात गोरक्षण आणि गोसेवा या माध्यमांतून प्रयत्न करणारे पू. श्रीराम बालकदास महात्यागी महाराज ! ७१
१ ई. हिंदु धर्मशास्त्राचा प्रसार व्हावा, अशी तळमळ असलेले वृंदावन येथील पूज्यश्री राघवदास महाराज ! ७१
१ उ. हिंदुत्ववादी विचारधारा असलेले पूज्यश्री रसियाबाबा ! ७१
**२. सनातन संस्था आणि कुंभमेळा** ७१
२ अ. कुंभमेळ्यात गोहत्येविषयी चिंतन बैठक आणि तिच्यात सनातन संस्था

अन् हिंदु जनजागृती समिती यांचा सहभाग ! ७१
२ आ. सनातन संस्था आणि हिंदु जनजागृती समिती यांच्या संदर्भात संतांचे उद्गार ७२
२ इ. सनातनवरील प्रेमापोटी सनातनला साहाय्य करणारे संत ७३
२ ई. प्रयाग (अलाहाबाद) येथील कुंभमेळ्यात संतांकडून शिकायला मिळालेली सूत्रे ७५

# मनोगत

कुंभमेळ्याचे आध्यात्मिक माहात्म्य आणि सांस्कृतिक महत्त्व अनन्यसाधारण आहे. कुंभमेळ्यात येणाऱ्या ज्ञानी आणि तपस्वी साधूसंतांच्या सत्संगामुळे भाविकांमध्ये भक्तीभावाची वृद्धी होते. भक्तीचा मेळा असलेल्या कुंभमेळ्यात कोट्यवधी भाविक येत असल्याने हिंदूंच्या एकतेचेही तेथे दर्शन होते. गेल्या काही वर्षांत प्रयागराज, हरद्वार (हरिद्वार), उज्जैन आणि त्र्यंबकेश्वर-नाशिक येथे झालेल्या कुंभमेळ्यांतील पर्वांत मात्र विदारक स्थिती दिसून आली. समाजापुढे आलेल्या तेथील दुःस्थितीचे वर्णन या ग्रंथात दिले आहेत.

साधू-संत म्हणजे वैराग्याचे सगुण रूप ! स्पर्धा, ईर्ष्या, तुलना, दिखाऊपणा, लोकेषणा यांतून अलिप्त झालेले जीव ! भौतिक जीवनातील अपेक्षा, मानसन्मान, धनदौलत यांपासून अलिप्त असणे, ही खऱ्या साधू-संतांची वैशिष्ट्ये असतात; मात्र कुंभमेळ्यांत नेमके याउलट चित्र दिसून आले. आपापसातील ईर्ष्या आणि श्रेष्ठत्वाची स्पर्धा यात अनावश्यक शक्ती, वेळ अन् पैसा व्यय होत असल्याचे दिसले. एकूणच व्यावहारिक जीवनातील दोष कुंभक्षेत्रातील या तथाकथित साधू-संतांमध्येही प्रकर्षाने कार्यरत असल्याचे दृश्य दिसून येत होते.

'साधू म्हणजे धर्माचे ज्ञाते, जनतेला धर्म शिकवणारे व्यक्तीमत्त्व', अशी सर्वसाधारण समजूत आहे. त्यामुळेच भगव्या वस्त्रांकित अशा निरिच्छ साधूंविषयी हिंदु मनात आदराचे स्थान आहे. अशा स्थितीत त्यांचे आचरण, तसेच धर्मविषयक दृष्टीकोन समाजाला मार्गदर्शक ठरतील, असे असायला हवे. त्यांचे वर्तन समाजाला आदर्शवतच असायला हवे; मात्र कुंभपर्वांत धर्महिताला घातक अशा प्रवृत्ती त्यांच्यात आढळून आल्या. अनुकरणीय आणि वंदनीय असलेल्यांच्या अशा वर्तणुकीचा समाजावर पुष्कळ विपरीत परिणाम होतो. अज्ञानातून घडलेला मोठा अपराधसुद्धा क्षम्य असतो; परंतु साधूवेष धारण करून ज्ञानी म्हणवणाऱ्यांकडून आणि सामाजिक अन् धार्मिक मान्यता मिळवू इच्छिणाऱ्यांकडून होणारी चूक म्हणजे मोठा धर्मद्रोहच म्हणायला हवा ! 'साधू म्हणजे त्याग', अशी साधूंची समाजात परंपरागत ओळख आहे. या पार्श्वभूमीवर ज्यांच्या वर्तनातून लोभ, आसक्ती आणि

लोकेषणेपोटी हेवेदावे अन् अडवणूक यांचे प्रदर्शन होते, त्यांच्याकडून धर्मकार्य तरी काय होणार ? प्रस्तुत ग्रंथात अशा तथाकथित साधू-संतांच्या हिंदु धर्माला लांछनास्पद असणार्‍या आणि ‘संत’ या उपाधीचा अवमान करणार्‍या वर्तनांचे वर्णन केले आहे.

कुंभमेळ्याचे मुख्य केंद्रबिंदू असलेल्या साधूंच्या धर्माला हानीकारक असलेल्या वर्तनाचा लाभ धर्मद्रोही लोक आणि प्रसारमाध्यमे घेत आहेत. हिंदु धर्माच्या उदात्त परंपरांचे पर्यायाने हिंदूंचे अगदी विकृत अन् गलिच्छ दर्शन कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर जगभर प्रसारित केले जाते. त्यामुळे कोणीही उठतो आणि हिंदु धर्मावर टीका करतो. एकेकाळी धर्मसत्तेच्या अंकुशाखाली असलेल्या राजसत्तेऐवजी आता ‘दुर्जन आणि अधर्मी राजकारण्यांच्या आधाराने चालणारे अशोभनीय धर्मकारण’, असे स्वरूप कुंभमेळ्याला प्राप्त होत असल्याचे या ग्रंथातील लिखाणात विशद केल्याप्रमाणे आढळून येते.

अन्य धर्मियांच्या उत्सवांना सवलतींची खिरापत वाटणारे प्रशासनही आपल्या हिंदुद्वेष्टेपणाची झलक या कुंभमेळ्यांच्या आयोजनात दाखवून देऊन त्यातील दुःस्थितीला हातभार लावत असते. हिंदूंमध्ये असलेल्या संघटितपणाच्या अभावामुळेच प्रशासन, प्रसारमाध्यमे यांच्या हातात धर्मावर टीका करण्याचे आयतेच कोलीत मिळाले आहे.

केवळ साधूंनीच नव्हे, तर याला उत्तरदायी (जबाबदार) असलेल्या सर्वच हिंदूंनी याचा अत्यंत अंतर्मुखतेने विचार करायला हवा आणि कुंभमेळ्यातील सर्व विकृती अन् दोष नष्ट करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करायला हवेत. समाजाला केवळ आदर्श कुंभमेळाच नव्हे, तर त्यातून समाजाची सात्त्विकता वाढवण्यासाठी कार्यरत असलेल्या हिंदु धर्माची महानता दाखवून द्यायला हवी, तरच हा ग्रंथ लिहिल्याचे सार्थक होईल.

केवळ साधूसंतांकडूनच नव्हे, तर हिंदूंकडूनही हिंदु धर्मात शिरकाव झालेल्या या अपप्रवृत्ती, विकृती आणि दोष दूर करण्याचे प्रयत्न होवोत अन् धर्माच्या पुनरुत्थानासाठी सर्वांकडून संघटितपणे प्रयत्न होवोत, अशी ईश्वरचरणी प्रार्थना ! - **संकलक**